गुरुवार, दि. १३ मार्च २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २२१ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# नागरी समस्यांवर शिवसेना आक्रमक

## जिल्हाप्रमुख भास्कर अंबेकर यांच्या नेतृत्वात आंदोलन

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील नागरी प्रश्न अत्यंत उग्र रूप धारण करू लागले आहेत. नुकत्याच काही दिवसापूर्वी जालन्यातील भवानीनगर येथील रस्त्याने जाणार्या एका चिमुकल्या सात वर्षाच्या मुलाला सात-आठ मोकाट कुत्र्यांनी घेरुन हल्ला केला. या मोकाट कुत्र्यांनी त्या चिमुकल्याच्या शरीराचे अक्षरशः लचके तोडले आहे. चिमुकल्याच्या शरीरावर झालेला जखमांवर १६० टाके पडले. मात्र सुदैवाने तो बचावला. ही घटना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी महानगर पालिकेच्या आवारात सांगितली तेंव्हा सर्व वातावरण स्तब्ध व भावनिक झाले होते. तर शहरात रस्त्याच्या मधोमध असणार्‍या विद्युत खांबांनीही एका निष्पाप नागरिकाचा बळी घेतला. यासह पाणी, स्वच्छता असे नागरी प्रश्न घेऊन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्कर अंबेकर यांनी आपल्या सहकार्‍यांसह महानगरपालिकेवर धाव घेतली. तेथे शिवसैनिकांनी प्रचंड घोषणाबाजी केली व शहरातील नागरी प्रश्नांकडे पालिकेचे होणारे दुर्लक्ष यावर होळीच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणावर बोंबा ठोकल्या.

यावेळी यावेळी उपजिल्हाप्रमुख बाबुराव पवार, शहरप्रमुख बाला परदेशी, घनश्याम खाकीवाले, दुर्गेश काठोठीवाले, विधानसभा संघटक दीपक रणनवरे, वैद्यकीय आघाडीचे डॉ.राजेश राऊत, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष मंगल मेटकर, मंजुषा घायाळ, नगरसेवक विजय पवार, संदीप नाईकवाडे, माजी नगरसेवक जे.के. चव्हाण यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

शिवसेना पक्षाचे पदाधिकारी आक्रमकपणे घोषणा देऊन प्रशासनाने समस्या सोडण्याची जोरदार मागणी केली. शिवसेना जिल्हाप्रमुख भास्कर अंबेकर यांनी उपस्थित पालिकेचे अधिकारी सहाय्यक आयुक्त केशव कानपुडे व प्रियंका राजपूत यांच्यावर समस्यांचा भडीमार केला. यावेळी अंबेकर म्हणाले की, जालना महानगरपालिकेला नागरिकांच्या जीवांचे काही देणे घेणेच राहिलेले नाही. काँक्रिटीकरण केलेल्या रस्त्याच्या मधोमध असलेले विजेचे खांब गेल्या अनेक महिन्यांपासून वाहतुकीस प्रचंड अडथळा निर्माण करीत आहेत. त्यावर वाहनाधारक धडकून एका निरापराध नागरिकाचा मृत्यू झाला आहे. असे असतानाही ते विद्युत खांब अजून हलवले नाहीत ते तात्काळ हलविण्यात यावेत. नागरिकांना दिले जाणारे पाणी अत्यंत अनियमित स्वरूपाचे दहा ते बारा दिवसाआड याप्रमाणे महिन्यात तीन वेळा तर वर्षभरात तीस ते पस्तीस दिवस देण्यात येते. त्यामुळे नागरिकांना प्रचंड यातना सहन कराव्या लागत आहेत. तर पाणीपट्टी मात्र ७०० रुपयांवरून २ हजार ७०० केली असून वसुलीही नोटीसा देऊन सक्ती न करण्याची मागणी करुन उन्हाळा सुरू झाला असल्याने पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करण्याची मागणी केली. शहरातील अनेक विभागांमध्ये कचर्यांचे मोठ-मोठे ढीग साचले आहेत, नाल्या कुटुंब भरून रस्त्यावर वाहत आहेत. त्यामुळे रोगराई मोठ्या प्रमाणावर पसरण्याची भीती आहे. अनेक विभागात घंटागाडी अत्यंत अनियमितपणे जाते त्यांचेही योग्य नियोजन करून स्वच्छता करण्यात यावी असे अंबेकर म्हणाले.

शहरातील अनेक रस्त्यांच्या बाजूने असलेले ड्रेनेज त्यावर ढापे नसल्याने अत्यंत धोकादायक बनलेले आहेत. त्यामुळे पादचारी, जेष्ठ नागरिक व लहान मुले यांना धोका निर्माण झाला आहे. तसेच रस्त्यावर मोठ्या प्रमाणात मोकाट जनावरे बसलेली असतात. त्यांच्यामुळे अनेक दुचाकीस्वार, सायकल चालक व वाहनचालकांना अनेक वेळा अपघात व वाहतुकीच्या कोंडीचा सामना करावा लागत असल्याने त्याचाही बंदोबस्त पालिकेच्या वतीने करण्यात यावा. शहराला पाणीपुरवठा करणार्या जलकुंभांची सुरक्षा ही वार्यावरच आहे. नूतन वसाहत भागातील जलकुंभात मागील महिन्यांपूर्वी कुजलेल्या अवस्थेतील एक मृतदेह आढळून आला होता व तसाच पाणी पुरवठा नागरिकांना करण्यात




आल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले होते. शहरातील अशा सर्व जलकुंभांना संरक्षण भिंत असावी, वॉचमन व सीसीटीव्हीची व्यवस्था करण्याची मागणी केली. अशी व्यवस्था न केल्यास हजारो नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त केली. शहरातील चंदनझिरा, नूतनवसाहत, कन्हैयानगर भागातील नागरिकांना स्मशानभूमीची अत्यंत गरज आहे. अनेक वर्षापासून त्यांची मागणी असतानाही पालिकेने त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. येथील नागरिकांना तीन ते चार किलोमीटर अंतरावर जाऊन अंत्यविधी करावा लागत असल्याने त्यांची मागणी तात्काळ सोडविण्याची मागणी जिल्हाप्रमुख अंबेकर यांनी केली. या आंदोलनात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पदाधिकारी यांच्यासह सामान्य नागरिकही उस्फूर्तपणे सहभागी झाले होते. हातात मागन्यांचे फलक घेऊन समस्या सोडवण्याची जोरदार मागणी करीत होते.

प्रशासनाला वारंवार निवेदने देऊनही त्याचा काही उपयोग न झाल्याने आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) **पान ३ वर**

युवा आदर्श

### चौचले ...

कुणाला का कळेना
काय मनात साचले
करी विक्षिप्त विचार
कुणा कसे ना सुचले
घ्यावेलागे पक्षांमध्ये
जरी कुणा ना रुचले
नाराजहोई निष्ठावंत
आयुष्यज्यांने वेचले
सोडूनि जुने जाणते
पुरवा यांचेच चोचले
दुःख कायम सोबती
सुख अशांना बोचले
जी हुजूरी करे सतत
सर्वांत आधी पोचले
इतरांना बाजू सारुन
वरिष्ठांचे कानटोचले
मोरपीस शो बाजीचे
शिरटोपे पहाखोचले
कल्पना येणार नाही
कसले कुंभाड रचले
दुस-यांची स्तुतीहोई
यांच्यापोटात डाचले
वरकरणी उत्साह तो
वरातीत पुढे नाचले
एकधरणीकंप होता
मुळासकट रे खचले
दल बदलू करी घात
वेळी पाहिजे ठेचले

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# परतूर पालिकाचा गलथान कारभार; पाणी मिळेना!

## नागरिकांवर भटकंतीची वेळ; पाणीपुरवठा तात्काळ सुरळीत करण्याची पाडेवार यांची मागणी

**परतूर । प्रतिनिधी -** उन्हाळ्याच्या तोंडावर परतूर शहरातील पाणी पुरवठा गेल्या चार दिवसांपासून बंद असल्याने पाण्यासाठी नागरिकांना भटकंतीची वेळ आली आहे. नगरपालिका प्रशासनाने याकडे त्वरित लक्ष देऊन शहराचा पाणीपुरवठा सुरू करावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार यांनी नगरपालिकेच्या मुख्याधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की,परतूर शहर व परिसराला पाणी पुरवठा करणाऱ्या निम्न दुधना प्रकल्पातुन होणारा पाणीपुरवठा निम्म धुदना प्रकल्पाने थकित ३६ लाख ९४ हाजार २१२ रुपयांच्या बिला पोटी बंद केला असुन मोठी भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी नगर परिषद प्रशासनाच्या काहीही



हालचाली दिसत नाहीत. शहरात अनेक ठिकाणी हातपंप घेण्यात आले आहेत. पण ते आजमितीला दुरुस्तीअभावी पूर्णपणे बंद अवस्थेत आहेत. मागील अनेक दिवसांपासून हातपंप दुरुस्त करावी अशी मागणी होत आहे. पण याकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे. सध्या परतूर शहरात पाच दिवसांआड पाणी पुरवठा करण्यात येतो. प्रकल्पातील पाणीसाठा पाहता शहराला दररोज पाणी पुरवठा केला जाऊ शकतो मात्र नियोजना अभावी तो केला जात नाही.त्यात शहरातील अनेक हातपंप ना दुरूस्त असल्याने शहरातील नागरिकांना पाणी आणावे तरी कुठून असा प्रश्न पडला झाला आहे.

पाणीपुरवठा तात्काळ चालु करावा नसता नगरपालिका प्रशासनाच्या विरोधात जनआंदोलन छेडण्यात येईल असेही पाडेवार यांनी म्हटले आहे.

माध्यमिक शिक्षणाधिकारी हटाव प्रकरण

# शिक्षण उप संचालकांनी मागितला अहवाल

## शिक्षणाधिकारी हटाव आंदोलनाचा परिणाम!

**जालना । प्रतिनिधी -** माध्यमिक शिक्षणाधिकारी जालना यांच्या दालनात दि २५फेब्रुवारी २०२५ रोजी झालेल्या प्रकरणाविषयी शिक्षण उपसंचालक छत्रपती संभाजीनगर प्रकाश मुकुंद यांनी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम तसेच त्यांच्या शिष्टमंडळासोबत चर्चा करण्यासाठी काल दि १०मार्च रोजी दुपारी ४ वा बैठक आयोजित केली होती या बैठकीत माध्यमिक शिक्षणाधिकारी जालना मंगला राजू गायकवाड धुपे यांच्या भ्रष्ट कारभाराविषयी व कार्यालयीन कामाच्या दप्तर दिरंगाई बद्दल आणि पदाधिकाऱ्यांना तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अपमानास्पद वागणूक देऊन



त्यांच्यावर खोटे गुन्हा दाखल करणे या विषयी आरोप पत्र ठेवण्यात आले होते येत्या दोन दिवसात त्यांच्याविरुद्ध सहाय्यक शिक्षण उपसंचालक डॉ सतीश सातव यांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी समिती नेमून सखोल चौकशी करण्यात येईल व कठोरातील कठोर कारवाई केल्या जाईल त्यासंबंधी अनुपालन अहवाल सादर करण्यासाठी माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना आठ दिवसाची मुदत देण्यात **पान ३ वर**

# देशातील ८० कोटी लोकांना मोफत धान्य, मग भाजपा सरकारने कोणाचा विकास केला?

## काँग्रेस खासदाराचा सवाल

**मुंबई -** प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेच्या माध्यमातून देशात ८० कोटी तर महाराष्ट्रातील ग्रामीण भागात ७६.३२% आणि शहरी भागात ४५.३४% लोकसंख्या लाभार्थी आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात गरिब लोक आहेत तर मग ११ वर्षात कोणाचा विकास झाला? असा प्रश्न उपस्थित करत भाजपा सरकारच्या काळात फक्त मुठभर लोकांचा विकास झाला असून बहुसंख्य जनता ही गरिबीचे जीवन जगत आहे, विकासाच्या फक्त गप्पा मारल्या जात आहेत, असे खासदार वर्षा गायकवाड म्हणाल्या. केंद्रातील मोदी सरकारने देशभरातील रेशनकार्ड (ठरींळेप लरीव) धारकांना कोराना काळात मोफत धान्ये देण्यास सुरुवात केली होती. मात्र, कोरोना गेल्यानंतर देखील सरकारकडून या मोफत धान्य योजनेला मुदतवाढ देण्यात आली आहे. आता, पुढील ५ वर्षांपर्यंत नागरिकांना मोफत धान्य मिळत आहे, त्यावरुन, काँग्रेसने विकासाच्या मुद्द्यावरुन भाजपला लक्ष्य केलं आहे.

लोकसभेत खासदार प्रा. वर्षा एकनाथ गायकवाड यांनी विचारलेल्या तारांकित प्रश्न क्रमांक १९४ अंतर्गत प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेसंदर्भात महत्त्वपूर्ण माहिती समोर आली आहे. ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाने दिलेल्या उत्तरानुसार महाराष्ट्रातील सुमारे ७००.१७ लाख व्यक्तींना म्हणजे ७ कोटी १७ लाख नागरिकांना या योजने अंतर्गत मोफत धान्याचा लाभ **पान ३ वर**



## संपादकीय

## अपप्रवृत्तीमुळे पवित्र सणाला गालबोट !

होळी हा आपल्या संस्कृतीतील एक मोठा आणि महत्वाचा सण आहे. भारतातील वेगवेगळ्या भागात फाल्गुन पौर्णिमेला हा सण विविध नावांनी साजरा केला जातो. हा सण होळी, होलिकादहन, शिमगा, हुताशनी महोत्सव, दोलायात्रा, काम दहन अशा विविध नावांनी साजरा केला जातो. होळीच्या दिवशी आपण आपल्या मनातील वाईट विचारांना होळीप्रमाने आगीत जाळून राख करावे अशी कल्पना आहे. त्यामुळे आपले मन निर्मळ व्हावे अशी अपेक्षा असते. आपल्या मनातील वाईट विचारांना होळी प्रमाणे आगीत जाळून सत्प्रवृत्ती आणि सद्गुणांचा संकल्प करण्याचा हा दिवस. महाराष्ट्रात हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. कोकणात तर हा सण अधिक मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. कोकणात हा सण पाच ते पंधरा दिवस असतो. होळीच्या दुसऱ्या दिवशी धुलीवंदनाचा सण साजरा केला जातो. याला धुळवड असेही म्हणतात. होळीच्या दुसऱ्या दिवशी अग्नीत गव्हाच्या ओंब्या भाजण्याची प्रथा आहे. या दिवसात गव्हाचे पीक तयार होते हे त्यामागील एक कारण असू शकते. नवीन पीक अग्नी देवतेला समर्पित करण्याची प्रथा आहे. या दिवशी एकमेकांना गुलाल लावून रंगाची उधळण करणे. सर्वांनी एकत्र येणे, बंधुभाव आणि एकता जपणे हा याचा उद्देश. बंधुभाव आणि एकतेचे प्रतीक म्हणून या सणाकडे पाहिले जाते. या दिवशी लोक आपसातील भेदभाव भांडण विसरून एकत्र येतात मात्र गेल्या काही वर्षात या सणामध्ये शिरलेल्या अपप्रवृत्तीमुळे या सणाचे पावित्र्य लोप पावले आहे. होळीचा सण साजरा करताना धांगडधिंगा घातला जातो. धुलीवंदनाच्या दिवशी तर एकमेकांना गुलाल लावण्याऐवजी रसायन मिश्रित रंग लावले जातात. पाण्याचा अपव्यय केला जातो. काही समाज कंटक पाण्याने, रंगाने भरलेले फुगे, पिशव्या रेल्वे गाड्या, बसगाड्यावर तसेच रस्त्यावर फेकून मरतात. त्यात अनेकजण जखमी होतात. अशा घटनांत यापूर्वी काहींना आपले डोळे गमवावे लागले आहेत तर काहींना कायमचे अपंगत्व आले आहे. काही महाभाग तर जाणीवपूर्वक महिलांना टार्गेट करतात. काहीजण रंगाऐवजी नासकी अंडी फेकून मारतात. काहीजण तर या दिवशी लाऊस्पिकरवर मोठ्या आवाजात गाणी लावून हिडीस नृत्य करतात. धुलीवंदनच्या दिवशी मद्यपान करण्याची नवीनच फॅशन निर्माण झाली आहे. मद्यपान करून नृत्य करताना बऱ्याचदा वाद होतो. हा वाद विकोपाला गेला तर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. वास्तविक होळी आणि धुलीवंदन हे अतिशय पवित्र सण आहेत. मात्र या अपप्रवृत्तीमुळे या सणाला गालबोट लागत आहे. ही अपप्रवृत्ती दूर करून सर्वांनी होळीचा सण साजरा करावा. जे समाज कंटक या पवित्र सणाला गालबोट लावतील त्यांना पोलिसांनी कडक शासन करावे

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

### वाचकांचे मनोगत

## भोंग्या मागे दडलंय काय ?

प्रार्थना स्थळांवरील भोंगे पुन्हा चर्चेत आले आहेत. महाराष्ट्रात सर्वधर्मसमभाव मानला जातो.सर्व धर्मिय लोक मुंबई- महाराष्ट्रात वास्तव्यास आहेत. प्रत्येक धर्मियांचे प्रार्थनास्थळ वेगवेगळे आहे.प्रार्थना स्थळावर भोंगे लावण्याची गरज काय ? प्रत्येकाने आपल्या धर्मरुढी प्रमाणे पुजा अर्चा करावी.भोंगा लावण्याची गरज नाही. आपली भक्ति आपल्या पूर्ती मर्यादित असावी.अन्य धर्मियांना आपल्यापासून उपद्रव होणार नाही याची खबरदारी ध्यावी. राजकीय पक्ष आपल्या स्वार्थासाठी चुकीच्या पद्धतीचा अवलंब करतात. मशिदींवरील भोंगे कोणीतरी मुक संमती दिल्या शिवाय लागलेले नाहीत.स्वातंत्र्याच्या लढ्यात सर्व धर्मिय होते.त्यांच्या त्यागातून स्वातंत्र्य मिळाले.महानगरपालिकांचे शांतता क्षेत्र विभाग जाहीर केलेले असतात.रुगणालय,शाळा, महाविद्यालय, न्यायालय,मंदिर, मशीद, चर्च,गुरुद्वार इत्यादी ठिकाणी शांतता पाळावी असे नियम ,निर्देश आहेत. तरीही ध्वनिप्रदूषण होते. ज्याने कोणी भोंगे लावण्यास मुक परवानगी दिल्याने गंभीर समस्या निर्माण झाली त्याची जबाबदारी त्यांनी घेऊन परिणामांची कारणमिमांसा शोधावी.परवानगी घेऊन भोंगे लावण्याची अनुमती दिली तर सर्वच धर्मांच्या प्रार्थनास्थळांवर भोंगे वाजले तर ध्वनिप्रदूषण कसे रोखणार ? रात्री १० नंतर आणि सकाळी सहा वाजेपर्यंत बंदी म्हणजे झोपण्याचा कालावधी झाला.विद्यार्थी रात्री ,पहाटे लवकर उठून अभ्यास करतात, रुगणालयात रूग्ण औषधोपचार घेत असतात, जेष्ठ नागरिक आवाजाने त्रस्त होतात अशांनी काय करावे ? शासनानेच यावर कायम स्वरुपी निर्णय घ्यावा ,सर्वधर्मसमभाव जपावा.भोंग्यांचे राजकारण करु नये.सर्व काही निवडणुकीतील मतांसाठी निर्णय घेण्यात येतात अशी जनतेच्या मनाची धारणा होते. शासनाने सर्व धर्मियांचा विचार करावा.

**महादेव गोळवसकर**
**कुर्ला मुंबई**
**९८६९४७६२०९**
mahadeogolvaskargmail.com

# धूम्रपान,मद्यपानच्या जाहिराती आयपीएलमध्ये नकोत याचे स्वागतच, परंतु इतरत्रही नकोच!

आयपीएल सामन्यांदरम्यान मैदानाच्या परिसरात आणि दूरचित्रवाणीवरील प्रसारणामध्ये तंबाखूजन्य पदार्थ आणि मद्याच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष जाहिराती करू नयेत अशी विनंती केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने केली आहे.यात त्यांनी म्हटले आहे की, सार्वजनिक आरोग्याचा विचार करणे ही नैतिक जबाबदारी आहे.माझ्यामते आरोग्य मंत्रालयाने आयपीएलला विनंती करण्यापेक्षा आदेश दिला असता तर बरे झाले असते. तंबाखूजन्य पदार्थ, धूम्रपान आणि मद्यपान घातक आहे ही बाब जगजाहीर आहे व याची माहिती आरोग्य मंत्रालय व सरकारला सुध्दा आहे.मग सरकार अशा घातक पदार्थांच्या उत्पादनावरच बंदी का घालत नाही? असे जर झाले तर जाहिरातही होणार व कोणी धूम्रपान व मद्यपान सुध्दा करणार नाही.हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो.सरकार धूम्रपान, मद्यपानच्या जाहिराती बद्दल फक्त आयपीएल पुरते सिमित राहुन चालणार नाही तर सार्वजनिक ठिकाणे, शाळा - महाविद्यालय परिसर, सोशल मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, डिजिटल मीडिया किंवा इतर प्रसार माध्यमांद्वारे धूम्रपान, मद्यपानच्या जाहिराती होणार नाही याचीही जबाबदारी सरकारने घेतली पाहिजे.कारण धूम्रपान मानवजातीसाठी अत्यंत घातक आहे.भारतात हृदयरोग, कर्करोग, फुफ्फुसांचे आजार, मधुमेह, उच्चरक्तदाब आदींमुळे दरवर्षी ७० टक्क्यांहून अधिक मृत्यू होतात.तंबाखू आणि मद्याचे सेवन हे असंसर्गजन्य आजारांच्या प्रमुख कारणांपैकी एक आहे. जगभरात तंबाखूमुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये भारत दुसऱ्या क्रमांकावर असून दरवर्षी सुमारे १४ लाख नागरिक जीव गमावतात,तर मानसिक चिंतेवर पर्याय म्हणून भारतात मद्याचे सेवन होते. शेवटी कोणतीही नशा असो ती घातकच असते. आयपीएल ही भारतात सर्वाधिक पाहिली जाणारी क्रीडा स्पर्धा असल्याने कोणत्याही व्यासपीठावर तंबाखू, मद्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रसार होणे हे आरोग्य आणि तंदुरुस्तीबद्दल परस्पर विरोधी संदेश देणारे आहेत असे पत्रात आरोग्य मंत्रालयाने अधोरेखित केले आहे.आरोग्य मंत्रालयाने फक्त आयपीएलला गृहित धरून चालता येणार नाही तर देशातील इतरही छोट्या-मोठ्या खेळांच्या बाबतीत व सार्वजनिक ठिकाणांच्या बाबतीत तंबाखू, मद्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रसार(जाहिरात) होणार नाही याचीही काळजी घेतली पाहिजे



तेव्हाच धूम्रपान, मद्यपानाच्या जाहिरातीवर नियंत्रण ठेवता येईल व आरोग्य सुदृढ रहाण्यास मोठी मदत होईल. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने धूम्रपान, मद्यपान किंवा इतरत्र नशेली वस्तूंच्या बाबतीत कोणालाही विनंती करण्याची गरज नाही. सरळ आदेश देऊन अशा घातक जाहिरातींवर ताबडतोब बंदी घालावी व कोणी नशेली वस्तूंची जाहिरात करीत असेल त्यांच्यावर कठोर कारवाई करून योग्य ती शिक्षा द्यावी.तेंव्हाच अशा घातक जाहिरातींवर आळा बसेल.

**रमेश कृष्णराव लांजेवार,**
**(स्वतंत्र पत्रकार) नागपूर.**
**मो.नं.९९२१६९०७७९.**

# होळी (हुताशनी पौर्णिमा) सणामागील शास्त्र

फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी येणारा होळी हा सण देशभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. दुष्ट प्रवृत्ती आणि अमंगल विचार यांचा नाश करून सत् प्रवृत्तीचा मार्ग दाखवणारा उत्सव म्हणजे होळी. वृक्षरूपी समिधा अग्नीत अर्पण करून त्याद्वारे वातावरणाची शुद्धी करणे, हा उदात्त भाव होळी साजरी करण्यामागे आहे. होळी सणाचे महत्त्व, हा सण साजरा करण्याची पद्धत याविषयीची शास्त्रीय माहिती या लेखातून देण्याचा प्रयत्न केला आहे.

होळी सणाची तिथी : देशपरत्वे फाल्गुनी पौर्णिमेपासून पंचमीपर्यंतच्या ५ - ६ दिवसांत कुठे दोन दिवस तर कुठे पाचही दिवस हा उत्सव साजरा केला जातो.

होळी सणाला असलेले समानार्थी शब्द : उत्तर भारतात याला होरी, दोलायात्रा, तर गोवा आणि महाराष्ट्र या राज्यांत शिमगा, होळी, हुताशनी महोत्सव अन् होलिकादहन आणि दक्षिणेत कामदहन अशा संज्ञा आहेत. बंगालमध्ये दौलायात्रा म्हणून होळीचा सण साजरा करतात. याला 'वसंतोत्सव' अथवा 'वसंतागमनोत्सव' म्हणजे वसंत ऋतूच्या आगमनासाठी साजरा करायचा उत्सव हे नावही देता येईल.

होळी सणाचा इतिहास : (अ.) ऋपूर्वी ढुंढा किंवा ढौंढा नामक राक्षसी गावात शिरून लहान मुलांना पीडा द्यायची. ती रोग निर्माण करायची. तिला गावाबाहेर हाकलून देण्याकरिता लोकांनी पुष्कळ प्रयत्न केले; पण ती जाईना. शेवटी लोकांनी बीभत्स शिव्या-शाप देऊन आणि सर्वत्र अग्नी पेटवून तिला भिववले अन् पळवून लावले. त्यामुळे ती गावाबाहेर पळून गेली.' असे भविष्योत्तरपुराणात म्हटले आहे.

आ. एकदा भगवान शंकर तपाचरणात गढले होते. ते समाधी अवस्थेत असतांना मदनाने त्यांच्या अंतःकरणात प्रवेश केला. तेव्हा 'मला कोण चंचल करत आहे', असे म्हणून शंकराने डोळे उघडले आणि मदनाला पहाताक्षणीच जाळून टाकले. दक्षिणेतील लोक कामदेव दहनाप्रीत्यर्थ हा उत्सव साजरा करतात. या दिवशी मदनाची प्रतिकृती करून तिचे दहन करतात. या मदनाला जिंकण्याची क्षमता होळीत आहे; म्हणून होळीचा उत्सव आहे.

फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी झालेल्या पृथ्वीवरील प्रथम महायज्ञाची स्मृती म्हणून प्रत्येक वर्षी फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी सर्व भारतात 'होली' या नावाने यज्ञ होऊ लागले.

होळीचे महत्त्व : (अ.) विकारांची होळी करून जीवनात आनंदाची उधळण करायला शिकवणारा सण : 'होळी' हा विकारांची होळी करण्याचा फाल्गुन मासातील सण आहे. 'विकारांची जळमटे जाळून टाकून नवीन उत्साहाने सत्त्वगुणाकडे जाण्यासाठी आम्ही सिद्ध आहोत', याचे जणू तो प्रतीकच आहे. राहिलेला सूक्ष्म-अहंकार हाही होळीतील अग्नीत नाहीसा होतो. तो शुद्ध सात्त्विक होतो. त्यानंतर रंगपंचमी आनंदाची उधळण करत येते. नाचत-गात एकत्र येऊन जीवनाचा आनंद लुटायचा. श्रीकृष्ण-राधा यांनी रंगपंचमीद्वारे सांगितले, 'आनंदाची उधळण करा.' असे प.पू. परशराम पांडे महाराज यांनी म्हटले आहे.

होळी आपले दोष, व्यसने आणि वाईट सवयी यांना घालवण्याची सुसंधी आहे.

होळी सद्गुण ग्रहण करण्याची / अंगिकारण्याची संधी आहे.

होळी उत्सव साजरा करण्याची पद्धत : देशभरात सर्वत्र साजरा केला जाणार्या 'होळी' या सणात लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण उत्साहाने सहभागी होतात. होळीची रचना करण्याची तिला सजवण्याची पद्धतीही स्थानपरत्वे पालटत असल्याचे सध्या पाहायला मिळते.

सर्वसाधारणपणे 'देवळासमोर किंवा सोयीच्या ठिकाणी पौर्णिमेच्या सायंकाळी होळी पेटवायची असते. बहुधा ग्रामदेवतेसमोर होळी उभी केली जाते.श्री होलिकापूजनाचे स्थान शेणाने सारवून अन् रांगोळी घालून सुशोभित करतात. मधोमध एरंड, माड, पोफळी अथवा ऊस उभा करतात. त्याच्या भोवती गोवर्या आणि सुकी लाकडे रचतात. घरातील कर्त्या पुरुषाने शुचिर्भूत होऊन आणि देशकालाचा उच्चार करून 'सकुटुम्बस्य मम ढुण्ढाराक्षसीप्रीत्यर्थं तत्पीडापरिहारार्थं होलिकापूजनमहं करिष्ये ।' असा संकल्प करावा आणि नंतर पूजा करून नैवेद्य दाखवावा. त्यानंतर 'होलिकायै नमः ।' असे म्हणून होळी पेटवावी. होळी पेटल्यावर होळीला प्रदक्षिणा घालावी आणि पालथ्या हाताने बोंब मारावी. होळी पूर्ण जळल्यानंतर ती दूध अन् तूप शिंपडून शांत करावी. श्री होलिकादेवतेला पुरणपोळीचा नैवेद्य, तसेच नारळ अर्पण करावा. मग जमलेल्या लोकांना त्याचा प्रसाद द्यावा. नारळ, पपनस यांसारखी फळे वाटावीत. सारी रात्र नृत्यगायनात व्यतीत करावी.

होळीची पूजा अशी करावी

प्रदीपानन्तरं च होलिकायै नमः इति मन्त्रेण पूजाद्रव्य-प्रक्षेकात्मकः होमः कार्यः । - स्मृतिकौस्तुभ

अर्थ : अग्नी प्रज्वलित केल्यावर 'होलिकायै नमः' या मंत्राने पूजाद्रव्ये वाहून होम करावा.

निशागमे तु पूज्येयं होलिका सर्वतोमुखैः । - पृथ्वीचंद्रोदय

अर्थ : रात्र झाल्यावर सर्वांनी होलिकेचे (वाळलेली लाकडे आणि गोवर्या रचून पेटवलेल्या अग्नीचे) पूजन करावे.

होलिकेची पूजा करतांना म्हणायचा मंत्र

अस्माभिर्भयसन्त्रस्तैः कृता त्वं होलिके यतः ।

अतस्त्वां पूजयिष्यामो भूते भूतिप्रदा भव ।। - स्मृतिकौस्तुभ

अर्थ : हे होलिके (वाळलेली लाकडे आणि गोवर्या रचून पेटवलेल्या अग्ने), आम्ही भयग्रस्त झालो होतो; म्हणून आम्ही तुझी रचना केली. यामुळे आता आम्ही तुझी पूजा करतो. हे होळीच्या विभूती ! तू आम्हाला वैभव देणारी हो.

होळीच्या दुसर्या दिवशी करायच्या धार्मिक कृती

प्रवृत्ते मधुमासे तु प्रतिपत्सु विभूतये ।
कृत्वा चावश्यकार्याणि सन्तर्प्य पितृदेवताः ।।
वन्दयेत् होलिकाभूतिं सर्वदुष्टोपशान्तये । - स्मृतिकौस्तुभ

अर्थ : वसंत ऋतूतील पहिल्या प्रतिपदेला समृद्धी प्राप्त व्हावी, यासाठी सकाळी प्रातर्विधी आटोपून पितरांना तर्पण करावे. त्यानंतर सर्व दुष्ट शक्तींच्या शांतीसाठी होलिकेच्या विभूतीला वंदन करावे.

(काही पंचांगांनुसार फाल्गुन पौर्णिमेच्या दुसर्या दिवशी येणार्या प्रतिपदेपासून वसंत ऋतूला आरंभ होतो.)

होळीच्या दिवशीची 'होलिका' ही 'होलिका' राक्षसीण नव्हे !

भक्त प्रल्हादाला घेऊन आगीत बसलेली 'होलिका' ही राक्षसीण होती. होळीच्या दिवशी म्हटल्या जाणार्या मंत्रांमध्ये जो 'होलिका' असा उल्लेख येतो, तो फाल्गुन पौर्णिमेला उद्देशून आहे; त्या राक्षसिणीला उद्देशून नव्हे. फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी लाकडे रचून होम करतात; म्हणून त्या तिथीला होलिका म्हणतात, असे वरील श्लोकांत आलेच आहे.

आयुर्वेदानुसार होळीचे लाभ - थंडीच्या दिवसांत शरिरात साठलेला कफ दोष होळीच्या काळात सूर्याच्या उष्णतेमुळे पातळ होतो आणि त्याच्यामुळे विकार उत्पन्न होतात. होळीच्या औषधी धुरामुळे कफ न्यून होण्यास साहाय्य होते. सूर्याच्या उष्णतेमुळे पित्त काही प्रमाणात वाढते. गाणे, हसणे आदींनी मन प्रसन्न होते आणि पित्त शांत होते. होळीच्या वेळी म्हटलेल्या रक्षोघ्न मंत्रांनी वाईट शक्तींचा त्रासही न्यून होतो.' असे वैद्य मेघराज माधव पराडकर,गोवा यांनी म्हटले आहे.

होळीतील 'बोंब मारणे' या कृतीमागील शास्त्र - हिंदूंचा एक पवित्र सण असलेल्या होळीच्या दिवशी होळी पेटवल्यानंतर बोंब मारण्याची प्रथा सर्वत्र पहायला मिळते. ही विकृती नसून त्यामागेही शास्त्र दडलेले आहे; मात्र काही ठिकाणी याचा अतिरेक केला जाऊन परस्परांतील वैर चव्हाट्यावर आणण्यासाठही बोंब मारली जाते. 'होळीच्या दिवशी अश्लील शब्द उच्चारणे, शिवीगाळ करणे आदी कृती परंपरा म्हणून केल्या जातात. याला धर्मशास्त्रात आधार नाही. मुळात संस्कृत भाषेत एकही शिवी नाही. असे असतांना 'शिवीगाळ करणे' हा हिंदूंच्या सणाचा भाग कसा होऊ शकेल ? होळीच्या दिवशी बोंब मारतांना शिवीगाळ करणे धर्मशास्त्राच्या दृष्टीने चुकीचे आहे. दुष्ट प्रवृत्ती शांत होण्याकरिता हा विधी आहे. फाल्गुन शुद्ध पौर्णिमेला पूर्वा फाल्गुनी नक्षत्र येते. त्या नक्षत्राची देवता 'भग' ही आहे. तेव्हा भगाच्या नावाने बोंब ठोकायची, ही एकप्रकारची पूजाच होय. तो त्या देवतेचा सन्मानच समजावा.

होलिकोत्सवातील गैरप्रकार रोखणे, हे आपले धर्मकर्तव्य आहे ! - सांप्रत होळीच्या निमित्ताने गैरप्रकार होतात, उदा. वाटमारी होते, दुसर्यांची झाडे तोडली जातात, मालमत्तेची चोरी होते, दारू पिऊन धिंगाणा घातला जातो. तसेच रंगपंचमीच्या निमित्ताने एकमेकांना घाणेरड्या पाण्याचे फुगे फेकून मारणे, घातक रंग अंगाला फासणे आदी गैरप्रकार होतात. या गैरप्रकारांमुळे धर्महानी होते. ही धर्महानी रोखणे हे आपले धर्मकर्तव्यच आहे. यासाठी समाजाचेही प्रबोधन करा. प्रबोधन करूनही गैरप्रकार घडतांना आढळल्यास पोलिसांत गार्हाणे करा. सनातन संस्था समविचारी संघटना आणि धर्मप्रेमी यांच्यासह यासंदर्भात अनेक वर्षांपासून जनजागृती चळवळ राबवत आहे. आपणही यात सहभागी होऊ शकता. वर्षभर होणार्या वृक्षतोडीने जंगले उजाड होत असतांना, त्याकडे काणाडोळा करणारे तथाकथित पर्यावरणवादी आणि धर्मविरोधी संघटना वर्षातून एकदा येणार्या होळीला 'कचर्याची होळी करा', अशा स्वरूपाच्या चळवळी राबवतात. ही धर्मविरोधी मंडळी परंपरा नष्ट करण्यासाठीच प्रयत्न करतात, हेच यातून दिसते. त्यामुळे हिंदूंच्या धार्मिक परंपरांत कोणी लुडबुड करू नये. हिंदूंनो, धर्मविरोधकांच्या भूलथापांना बळी न पडता पर्यावरणपूरक, अपप्रकार विरहित; मात्र धर्मशास्त्र सुसंगत अशी होळी साजरी करा.




**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'**
**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था**
**संपर्क- ९२८४०२७१८०**

# 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२४' लवकरच जाहीर करणार - मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई -** 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२४' साठी राज्यातून प्राप्त शिफारस प्रस्तावातील सर्व मान्यवरांचे महाराष्ट्रासाठी अत्यंत मोलाचे योगदान आहे. 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२४' अंतिम निर्णय हा सर्व संबंधितांशी विचारविनिमय करून लवकरच जाहीर करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

विधानभवन येथे 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२४' निवड समितीच्या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ.श्रीकर परदेशी, सांस्कृतिक कार्य विभागाचे संचालक बिभीषण चवरे, महाराष्ट्र भूषण पुरस्कार निवड समितीचे अशासकीय सदस्य डॉ. अनिल काकोडकर, दूरदृश्यप्रणालीद्वारे महाराष्ट्र भूषण पुरस्कार निवड समितीचे अशासकीय सदस्य ॲड. उज्ज्वल निकम, वासुदेव कामत, गो. ब. देगूलकर, डॉ. शशिकला वंजारी यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र भूषण पुरस्कार हा महाराष्ट्रातील सर्वोच्च नागरी सन्मान असून हा पुरस्कार कोणत्याही क्षेत्रात निरपेक्ष वृत्तीने सेवा करणाऱ्या तसेच त्याद्वारे मानवी जीवन उंचावण्यासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीला देण्यात येतो. 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२४' पुरस्कारासाठी शासनाला प्राप्त शिफारस प्रस्तावापैकी एकाची निवड करणे अत्यंत कठीण काम आहे. पुरस्कार निवड समिती सदस्यांनी सुचविलेली नावे लक्षात घेवून असून लवकरच हे पुरस्कार सर्व संबंधितांशी विचारविनिमय करून जाहीर करण्यात येतील.

सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी याबाबत सादरीकरण केले. महाराष्ट्र भूषण पुरस्कार निवड समितीचे अशासकीय सदस्य यांनी पुरस्कारासाठी निवड याबाबत मते मांडली.

### वसुलीच्या नावाखाली वॉटर ग्रीडचे पाणी बंद करणाऱ्या पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंताला तात्काळ निलंबित करा

# वसुलीला आमचं सहकार्य मात्र रझाकारी खपवून घेणार नाही

## माजी मंत्री आमदार लोणीकर विधानसभेत आक्रमक

**मुंबई -** परतूर विधानसभा मतदारसंघात तत्कालीन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या संकल्पनेतून व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेली मराठवाडा वॉटर ग्रीड ची सुरुवात परतुर मंठा विधानसभा मतदारसंघातून करण्यात आली आणि ते काम माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी जातीने लक्ष घालून वॉटर ग्रिड योजना पूर्णत्वाकडे नेली आणि आज रोजी विधानसभा मतदारसंघातील जवळपास सर्वच गावांना स्वच्छ व शुद्ध पाणी मिळत आहे परंतु गेल्या अनेक दिवसापासून सदरील योजनेचे पाणीपुरवठा वसुलीच्या नावाखाली बंद करण्यात आला होता हे बाब माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या निदर्शनास येताच क्षणी त्यांनी गोदावरी पाटबंधारे चे संचालक व पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता यांना धारेवर धरत मराठवाडा वॉटर ग्रीन योजनेचे पाणी तात्काळ सुरू करण्याचे सूचना दिले आहेत याबाबत तालुक्यातील ९० गावांसाठी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर धावून आल्याची चर्चा तालुक्यात पाहायला मिळत आहे.

**वसुलीला आमचं सहकार्य मात्र रझाकारी खपवून घेणार नाही**

इजरायलच्या धर्तीवर महत्वकांक्षी असलेल्या योजने बाबत मी वेळोवेळी लक्ष देऊन ही योजना पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करत आहे मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांना चुकीचा अहवाल आणि माहिती देऊन अभियंते परतूर मंठा विधानसभा व जालना तालुक्यातील काही भागातील व विशेष करून परतूर,मंठा शहराचा पाणी पुरवठा खंडित करीत आहे...

पालिका प्रशासन व ग्रामपंचायत यांना सोबत घेऊन जनता दरबार घेऊन वसुली करण्यासाठी मी स्वतः प्रयत्नशील आहे मात्र वसुलीच्या नावाखाली रझाकारी खपवून घेतली जाणार नसल्याचेही माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले.

**अधिक्षक अभियंता यांना खडसावून पाणी सुरळीत करण्याच्या सूचना**

परतूर,मंठा या दोन मोठ्या शहरांसह ९० गावांचा पाणी पुरवठा




मागील काही दिवसापासून खंडित करण्यात आला असल्याची बाब निदर्शनास येताच गोदावरी खोरेचे कार्यकारी संचालक व पाटबंधारे विभागाने अधीक्षक अभियंता यांना धारेवर धरत मराठवाडा वॉटर ग्रीडचा पाणी पुरवठा तत्काळ सुरू करण्यात याव्यात अशी भूमिका माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी घेतली आहे.

**धुलीवंदन, रमजान सणासुदीच्या दिवसात पाणी करून जनतेला वेठीस धरू नका**

हिंदू धर्मातील महत्वाच्या सणा पैकी एक सण म्हणजे धुलीवंदन व रमजान या दोन सणाच्या पार्श्वभूमीवर रझाकारी करून पाणी पुरवठा खंडित करण्यात आल्याने माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर चांगलेच तापले असल्याचे विधानभवन परिसरात दिसून आले आणि त्यांनी मराठवाडा वॉटर ग्रीडचा विषय विधानसभेच्या अभिवेशनात पटलाव घेऊन अधिकाऱ्यांची चांगलीच पंचायत केल्याचे बोलले जात आहे

**परतूर, मंठासह ९० गावासाठी आमदार लोणीकरांची तळमळ**

इजराइलच्या धर्तीवर महत्वकांक्षा असलेली मराठवाडा वॉटर ग्रीड योजना यशस्वीरित्या कार्यान्वित व्हावी यासाठी मागील अनेक वर्षापासून माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर हे सातत्याने पाठपुरावा करत असल्याचे दिसून येत असताना अचानक अधून मधून मराठवाडा वॉटर ग्रिडचे ग्रिडचा अधिकाऱ्यांच्या चुकीच्या धोरणामुळे व नियोजन शून्य कारभारामुळे खंडित होत असल्याने आमदार बबनराव लोणीकर आक्रमक भूमिका घेत वेळोवेळी अधिकाऱ्यांना धारेवर धरत तालुक्यातील परतूर नगरपरिषद मंठा नगरपंचायत यांच्यासह मतदारसंघातील ९० गावांसाठी धावून येऊन खंडित झालेला पाणी पुरवठा सुरळीत करून घेतात अशी प्रतिक्रिया जनसामान्य जनतेतून व्यक्त होतांना दिसत आहे.

# विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढा; महसूल विभागाचे आवाहन

**सिंधीकाळेगाव । प्रतिनिधी -** जालना तालुक्यातील सिंधीकाळेगाव येथे महसूल विभाकडून शेतकर्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. तसेच फार्मर आयडी काढण्यासाठी येणार्या अडीअडचणी या वेळी समजून घेण्यात आल्या.केद्र सरकार कडून राबवण्यात येणार्या या ग्रीस्टॅक योजना जिल्हात प्रभाविपणे राबवन्यात येत आहे.या साठी जास्तीत जास्त शेतकर्यांना या योजनेचा सहभागी होण्यासाठी महसूल विभागाकडून जनजागृती करण्यात येत आहे.ज्या शेतकर्यांच्या नावावर जमीन आहे.त्या प्रत्येक शेतकर्याने फार्मर आयडी काढणे गरजेचे आहे.त्यामुळे भविष्यात राबवण्यात येणार्या विविध योजनेचा लाभ शेतकर्यानी सहज मिळणार आहे.ग्रीस्टॅक ही महत्तव पुर्ण योजना आहे.या योजनेतून शेतकरी ,ग्राहक,सहकार यांना एकत्र आणते.

या मध्ये शेतकर्याना नोंदनी केल्यानंतर प्रशासनाकडून आधार कार्ड सारखा एक युनिक नबंर देण्यात येणार आहे. एप्रिल २०२५ पासून शेती विषय कोणतेही शासकीय लाभ घ्यायचा असतील तर हा यूनिक आयडी अनिवार्य करण्यात आला आहे.त्यामुळे शेतकर्यानी कसलीही भिती न बाळगता त्वरीत नोंदनी करावी असे तलाठी गजानन बारवाल यांनी केले.



या वेळी सरपंच सुभाष गिराम, महा सेवा चालक अंकूश जोगदड,जिजा गिराम सह शेतकरी उपस्थित होते. केंद्र सरकारच्या वतीने ग्रीस्टॅक योजना राबवण्यात येत आहे.

या मध्ये शेतकर्याना विशिष्ट ओळखपत्र देण्यात येणार आहे.त्यामुळे येणार्या काळात शेतकर्याना याचा मोठा फायदा होणार आहे. केद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी आता फार्मर आयडी महत्वाची राहणार आहे.ज्या शेतकर्याकडे फार्मर आयडी नसेल त्या शेतकर्याना पीएम किसान सन्मान निधी, पिक विमा सारख्या विविध योजनेचा लाभ शेतकर्याना मिळणार नसल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे सर्व शेतकर्यांनी फार्मर आयडी काढून घ्यावी असे आवाहन तलाठी गजानन बारवाल यांनी केले. फार्मर आयडी मुळे होणारे शेतकर्यांना मिळणार हे फायदे.

युनिक आयडी काढणाऱ्या शेतकर्यांना पी एम किसान डीबीटी लाभ. डिजिटल पीक कर्ज उपलब्ध होतील.पिक विम्याचा लाभ मिळेल.एम एस पी लाभ, वेळोवेळी हवामान खात्याची सूचना मिळतील,पिकविषयी सल्ला ,मृदा आरोग्य माहिती,बाजारभाव माहिती ,पीक पेरणी व उत्पादन वाढीसाठी अचूक मार्गदर्शन सह विविध फायदे नमूद करण्यात आले आहे.

सिंधीकाळेगाव येथे ग्रीस्टॉक योजनेची माहिती देतांना सिंधीकाळेगाव चे तलाठी गजानन बारवाल. सरपंच सुभाष गिराम. व शेतकरी उपस्थित होते.

# अपग्रेड होत शिक्षकांनी ज्ञान मिळवल पाहिजे - नारायण पिंपळे

## शिक्षक समृद्धी प्रशिक्षण, चौथ्या टप्प्याचा समारोप



**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यांमध्ये राज्य शैक्षणिक संशोधन परिषद मार्फत, तसेच जालना जिल्हा प्रशिक्षण व प्रशिक्षण संस्था, गटशिक्षणाधिकारी कार्यालय जाफराबाद, गटसावधन केंद्र जाफराबाद यांच्या संयुक्त विद्यमान, नवीन शैक्षणिक धोरण अंतर्गत शिक्षकांना ५० तासांच्या सीपीडी प्रशिक्षणाचा दरम्यान, शिक्षक समृद्धी प्रशिक्षण च्या चौथ्या टप्प्याचा समारोप आज जाफराबाद तालुका येथे झाला. जाफराबाद येथील यश महाविद्यालय येथे या प्रशिक्षणाची सांगता करण्यात आली. या प्रशिक्षणाच्या समारोप प्रसंगी गटसाधन केंद्राचे नारायण पिंपळे मी शिक्षकांना संबोधित करताना सांगितले की नवीन ज्ञानाची भूक शिक्षकांनी ठेवली पाहिजे. शिक्षकांना अक्रोड होतानाच त्यांनी ज्ञान मिळवला पाहिजे. आजच्या जगातील विद्यार्थी घडवताना आपल्याजवळ ज्ञान असले पाहिजे, तंत्रज्ञानाची शिदोरी असली पाहिजे, आणि त्यामुळेच भारतीय ज्ञान प्रणालीत कशी ठरेल याकडे लक्ष दिले पाहिजे. या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी प्रशिक्षण प्रमुख वसंतराव शेवाळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून राज्य तज्ञ प्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, राज्य तज्ञ डॉक्टर आनंदराव जाधव, नारायणराव पिंपळे, विजयराव बंड, काशिनाथ उखर्डे, दिलीप पऱ्हाड, राजेंद्र कणखर, माधवराव शिंदे, चव्हाण सर, गंगाराम आल्हाट, आदींच्या आवर्जून उपस्थिती होती, आईच्या टप्प्यातही २०० शिक्षकांनी प्रशिक्षण घेतले. या प्रशिक्षणा दरम्यान प्रशिक्षणाची चार टप्पे पार पडले. प्रत्येक टप्पा पाच दिवसाचा होता. या प्रत्येक टप्प्यामध्ये २०० शिक्षकांनी सहभाग नोंदविला. प्रशिक्षणा दरम्यान इयत्ता दहावी आणि इयत्ता बारावीच्या परीक्षा सुद्धा होत्या. या सर्व सांभाळून प्रशिक्षणार्थ्यांनी प्रशिक्षणही पूर्ण केली. सर्व शिक्षकांनी आपल्या मनोगतातून सांगितले की शासनाच्या कसे शिक्षण विभागाच्या प्रत्येक अपडेशनसाठी आम्ही तयार असून मुलांना अद्यावत ज्ञान देण्यासाठी आणि सज्ज आहोत.

# स्थगिती हटवा, न्याय द्या!; तहसीलमधील जन्म-मृत्यू प्रमाणपत्र प्रकरणांचा गोंधळ उघड

**जालना । प्रतिनिधी -** राज्यात जन्म-मृत्यू प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेवर लागू करण्यात आलेली स्थगिती आता वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. या पार्श्वभूमीवर अँड. महेश सिताराम धन्नावत यांनी एक निवेदन तयार करून आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री यांना पाठवले असून, तातडीने स्थगिती उठविण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, यापूर्वी जन्म-मृत्यू प्रमाणपत्र तहसील कार्यालयामार्फत देण्यात येत होते. मात्र माजी खासदार किरीट सोमय्या यांच्या तक्रारीनंतर ही प्रक्रिया स्थगित करण्यात आली आहे. त्यामुळे आधीपासून प्रलंबित असलेली प्रकरणे रखडली असून, नवीन अर्जही स्वीकारले जात नाहीत.

**विधवा व गरजू नागरिकांचे हाल -** अँड. धन्नावत यांनी नमूद केले आहे की, या निर्णयामुळे विधवा महिला, गरीब नागरिक आणि सर्वसामान्य जनतेला मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अनेक कुटुंबांतील जन्म किंवा मृत्यूची नोंद न झाल्यामुळे संबंधितांना सरकारी योजनांचा लाभ मिळू शकत नाही.

शासन निर्णय असूनही अमलबजावणी नाही

महाराष्ट्र शासनाने १२ मार्च २०२५ रोजी शासन निर्णय क्रमांक जमृनो. २५२५/(ई. ऑ. ९९११८१)/प्र.क्र.२२/कु.क द्वारे विलंबित जन्म-मृत्यू नोंदणीसंदर्भात प्रक्रिया निश्चित केली आहे. मात्र प्रत्यक्षात तहसील कार्यालयात याची अंमलबजावणी होत नसल्याची खंत व्यक्त करण्यात आली आहे.

**मुख्यमंत्री यांच्याकडे त्वरीत निर्णयाची मागणी**

अँड. धन्नावत यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे विनंती केली आहे की, ही स्थगिती तातडीने उठवून सुधारित कार्यपद्धतीनुसार तहसील कार्यालयांना निर्देश द्यावेत, जेणेकरून सामान्य नागरिकांना दिलासा मिळू शकेल.

राज्यात मृदसंधारण व जलसंधारण कामांची प्रत्यक्ष स्थळ पडताळणीसाठी मोबाईल ॲप व वेब पोर्टल विकसित करण्यात येणार असल्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी सांगितले. यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला.

# ग्रोव्हिजन गटशेती संघांचे नळविहिरा येथे चर्चासत्र संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील ग्रोव्हिजन गटशेती संघाच्या वतीने प्रत्येक महिन्याच्या ९ तारखेला आयोजिण्यात येणारे मार्च महिन्यातील नियमित मासिक चर्चासत्र रविवार (दि. ९ मार्च ) रोजी जाफराबाद तालुक्यातील मौजे नळविहिरा येथील पाटील कृषी फार्मवर अत्यंत उत्साहात पार पडले.

यावेळी ग्रोव्हिजन गटशेती संघाचे संस्थापक प्रमुख श्री. संजय मोरे पाटील, कृषी सहाय्यक श्रीमती ज्योती शिंदे, नाशिकचे श्री. सुनिल रौदळ, वालसाचे डॉ. गणेश पाटील पोटे, सिनगाव जहागीरचे श्री. संदीप बंगाळे, दहिगावचे श्री. नंदकिशोर देशमुख, अकोला देवचे श्री. सुधीर जोशी यांनी गटशेती व शेती क्षेत्रातील आप - आपले अनुभव कथन केले. यावेळी मुंबई निवासी ज्ञानदेव पाटील गाडेकर, बबन थुट्टे, युवराज मोरे आदी उपस्थित होते. यावेळी शिवार फेरीही झाली. भू प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात होऊन वन भोजनाने सांगता झाली.



## पान १ वरुन

### नागरी समस्यांवर ...

पक्षाच्या वतीने निवेदन न देता यापूर्वी दिलेल्या निवेदनांची होळी केली व डफडे वाजवून प्रचंड बोंबाबोंब करून पालिकेचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. या आंदोलनाने ही महापालिका प्रशासनाला जाग आली नाही तर शहरात यापेक्षाही मोठे आंदोलन उभे केले जाईल. असा इशाराही जिल्हाप्रमुख अंबेकर यांनी महानगर पालिका प्रशासनाला दिला.

यावेळी दलित आघाडीचे शहरप्रमुख संजय रत्नपारखे, वसीम खान, चेतन भुरेवाल, सखावत पठाण, जीवन खंडागळे, किशोर नरवडे, राजू वैद्य, तुकाराम भुतेकर, गणेश लाहोटी, दर्शन चौधरी, आकाश टेकुर, अजय रोडीये, सुनील तोडकर, पाऊलबुद्धे, सोनाजी खांडेभराड, योगेश जाधव, संतोष क्षत्रिय, इम्रान, शिवा मुळे, बळीराम शिंदे, जितेंद्र रत्नपारखे, गौतम साळवे, चंदा चव्हाण, रूपाली पवार, रंजना सरोदे, ज्योती वाडेकर, अंजली आठवले, प्रतीक्षा गवळी, राजेश शेळके, राजू इंगळे, नितीन वानखेडे, वसंत मुंडे, मदनराव खरात, कैलास मिसाळ, गणेश तरासे, नितीन वानखेडे, रामेश्वर कुरील, कांतराव कुंडलकर, ज्ञानदेव पोटे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक व नागरिकांची उपस्थिती होती.

### शिक्षण उपसंचालकांनी ...

आली आहे.

**काय ठेवण्यात आले होते आरोप?**

१) संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अपमानास्पद वागणूक देणे २) अर्वाच्य भाषा वापरून पदाधिकाऱ्यांच्या अंगावर धावून जाणे ३) दीर्घकाळ संचिका प्रलंबित ठेवणे ४) वरिष्ठांच्या आदेशाचे पालन न करणे ५) अर्थार्जनासाठी कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास देणे यासोबतच संघाने केलेल्या मागण्यानुसार १)दिनांक २७ फेब्रुवारी रोजी सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध करून द्यावेत २) वैयक्तिक मान्यतेमध्ये झालेली अनियमित दूर करावी ३) दीर्घ काळापासून प्रलंबित प्रकरणे निकाली काढावी. ४) सन २०२१ पासून च्या भविष्य निर्वाह निधी पावत्या देण्यात याव्यात ५) दहाव्या व सातव्या वेतन आयोगाचा थकीत पाचवा हप्ता त्याच पद्धतीने (१ला,२ रा,३रा व ४था ) हे थकीत हप्ते कोणत्याही कारणास्तव प्रलंबित असतील तर ते ७ फेब्रुवारी २०२५च्या परिपत्रकानुसार काटेकोरपणे अंमबजावणी करून माहे मार्च २०२५च्या वेतनासोबत देण्यात यावा या १ ते ५ मुद्द्यानुसार अनुपालन अहवाल सादर करण्यात यावा असे पत्रात नमूद केले आहे यावेळी संघटनेचे केंद्रीय उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे, सदस्य प्रेमदास राठोड , डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ सिनेट सदस्य डॉ उमाकांत राठोड, बामुक्तो चे सरचिटणीस तथा अर्थशास्त्राचे प्रसिद्ध अभ्यासक डॉ मारुती तेगमपुरे , सचिव चंद्रकांत भाई , चव्हाण, ढमढेरे , कदम ,जालना जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे, सचिव संजय येळवंते, उपाध्यक्ष जगन वाघमोडे, जेष्ठ पत्रकार तथा सेवानिवृत्त शिक्षक भगवान पालकर , अन्यायग्रस्त शिक्षिका मोहम्मद शिरीन बेगम शहा, प्रसिद्धी प्रमुख हकीम पटेल हे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

### देशातील ८० ...

मिळत आहे. यात राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्याअंतर्गत जानेवारी २०२५ मध्ये ३ लाख ८३ हजार ७६६ टन धान्य वाटप करण्यात आले असून महाराष्ट्रातील ग्रामीण भागात ७६.३२% आणि शहरी भागात ४५.३४% लोकसंख्या या योजनेंतर्गत समाविष्ट आहे. अंत्योदय अन्न योजना आणि प्राधान्य घराणीसाठी ठरींळेप उरीवी वितरित, यामध्ये SC/ST/OBC कुटुंबांचाही समावेश आहे. तर देशभरात ८१.३५ कोटी लाभार्थ्यांपैकी ८०.५६ कोटी नागरिकांना मोफत धान्य मिळत आहे. सरकारची आकडेवारी पाहता केंद्र सरकारच्या विकासाचे मोठे दावे फोल ठरत आहेत. ८० टक्के जनतेला ५ किलो मोफत धान्य द्यावे लागत असेल तर विकास गेला कुठे, मुठभर लोकांचा विकास म्हणजे सर्व समाज घटकांचा विकास नाही. सरकारची आकडेवारीच सांगते आजही बहुसंख्य लोक गरिबीत जीवन जगत आहेत. २०१४ पासून देशात गरिब व श्रीमंत यांच्यातील दरी वाढत असल्याचे ही आकडेवारीच सांगत असून ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे, असेही खासदार वर्षा गायकवाड यांनी म्हटले आहे.

मंठा शहर डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी स्वप्निल गोंडगे

## महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आदर्श पध्दतीने साजरी करा - मनोहर वाघमारे



**मंठा । प्रतिनिधी -** प्रत्येक वर्षी प्रमाणे याही वर्षी युगप्रवर्तक महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती मोठ्या उत्साहात समाज प्रबोधन पद्धतीने साजरी करण्यासाठी मंठा शहर ची बैठक (दि ९) रविवार रोजी शासकीय विश्रामगृह मंठा येथे मनोहरदादा वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सर्वानुमते अध्यक्षपदी युवा स्वप्निल मधुसूदन गोंडगे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली तर पुढीलपदी उपाध्यक्ष विलास सर्जेराव बनसोडे धम्मानंद सुभाष वाघमारे, सचिव गीतेश गणेश वाघमारे, सहसचिव सुमीत सोणाजी कामिटे, खजिनदार/कोषाध्यक्ष गंगाराम श्रीरंग गवळी, सह कोषाध्यक्ष भारत उत्तमराव खंदारे, संघटक राजरत्न कैलास वाघमारे, आकाश भगवान पंडित, कार्याध्यक्ष संघदिप गणेश वाघमारे, सम्राट अशोक आवचार, सल्लागार अरूण अंबादास वाघमारे, राजेश रावसाहेब घुले, प्रकाश अण्णा घुले, डॉ धोंडोपंत मानवतकर, संजय वाघमारे, प्रा.सोणाजी कामिठे, महेंद्र टेकुळे, ॲड. अनिल मोरे, प्रा.संतोष रंजवे, शरद मोरे, प्रदीप वाघमारे, संदीप इंगोले, बाबासाहेब इंगळे, यशपाल आवारे, ॲड. भरत कुमार अवसरमोल, भगवान वाघ, बाबासाहेब गवळी, आनंद वाघमारे, मुकेश काऊतकर, जिजाभाऊ देशमाने, प्रीटी मिडिया किरण आवचार, अनिल बा खंदारे, सोशल मिडिया महादेव पाखरे, विजय चव्हाण, शूभम अंभोरे, अदित्य वाघमारे यांची निवड करण्यात आली. यावेळी बोलतांना मनोहर वाघमारे म्हणाले की, महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आदर्श पध्दतीने साजरी करण्यासाठी सर्वांनी सहभाग नोंदवावा असे म्हणाले यावेळी सर्व समाज बांधवांची उपस्थिती होती.

## महाबोधी महाविहार मुक्तीसाठी वंचित बहुजन आघाडीचा कलेक्टर कचेरीवर मोर्चा

**जालना । प्रतिनिधी -** बिहार राज्यातील बोधगया येथील महाबोधी महाविहार मुक्तीसाठी वंचित बहुजन आघाडी व भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर बुधवारी ( दि. १२)मोर्चा काढण्यात आला.

वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष डेव्हिड घुमारे, जिल्हा महाराष्ट्र प्रशांत कसबे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष रमाबाई होर्शिल,युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष विजय लहाने, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष महेंद्र बनकर, राजेश सदावर्ते, मीनाबाई झिने यांच्या नेतृत्वाखाली अंबड चौफुलीवरून जिल्हाधिकारी कार्यालयावर हा मोर्चा काढण्यात आला. मोर्चापुर्वी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने मस्तगड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. सदर मोर्चा घोषणाबाजी करीत जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. यानंतर वंचित बहुजन आघाडी व भारतीय बौद्ध महासभेच्या शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांची भेट घेऊन त्यांच्या मार्फत राष्ट्रपती, बिहारचे मुख्यमंत्री आदींना निवेदन सादर केले.बोधगया, बिहार येथे बौद्ध भिक्कू यांचे महाबोधी महाविहार मुक्तीसाठी आंदोलन सुरू आहे. बोधगया महाविहार कायदा १९४९ रद्द करावा, बोधगया येथील महाबोधी महाविहाराचे नियंत्रण आंतरराष्ट्रीय बौद्धांना सोबत घेऊन बौद्धांच्या ताब्यात द्यावे, आदी मागण्यांचा या निवेदनात समावेश आहे. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष डेव्हिड घुमारे यांनी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी बोधगया येथील महाबोधी महाविहार मुक्तीसाठी जो लढा उभारला आहे, तो लढा पुढे नेण्यात येणार असल्याचे सांगितले.




या मोर्चात वंचित बहुजन आघाडीचे दीपक डोके, अकबर इनामदार, खालेद चाऊस, भानुदास साळवे, प्रकाश मगरे, विशाल मिसाळ, दीपक खाजेकर, ज्ञानेश्वर जाधव, गौतम वाघमारे, विलास नरवडे, अरुण गायकवाड, कैलास जाधव, प्रकाश पाखरे, प्रभू दाभाडे, राजू मगरे, भारतीय बौद्ध महासभेचे समाधान खरात, माधव पात्रे, देविदास पैठणे, गौतम हिवाळे, राम चंद्र पानवाले, दिनकर खरात, कुलदीप गरड, भास्कर साळवे, जयश्री पैठणकर, भास्कर पैठणकर यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते व भारतीय बौद्ध महासभेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.